**पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड**
पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे ३३
**दुरध्वनीक्र.** ०२०-२७३५०१२० ई मेल आयडी- dcphq.pcpc-mh@gov.in

**दिनांक - ०४/०९/२०२४**

## खंडणी विरोधी व औद्योगिक तक्रारी निवारण पथक, गुन्हे शाखेची कामगिरी

---

## पोलीस असल्याची बतावणी करुन ०२ कोटी रुपयाच्या खंडणीसाठी हिंजवडी येथुन विदयार्थाचे अपहरण करुन त्यास फलटण सातारा येथे डांबुन ठेवलेल्या ०२ आरोपीतांना अटक ८ लाख ४० हजाराचा मुद्देमाल जप्त

---

दिनांक २९/०८/२०२४ रोजी हिंजवडी पोलीस ठाणे हद्दीतून जांबे येथील कोलते पाटील सोसायटीतून एका विद्यार्थ्याचे अपहरण करुन, त्यास फलटण डांबून ठेवून, त्याचेकडुन ०२ कोटी रुपयेची खंडणीची मागणी करुन, पैसे न मिळाल्याने, त्याचेकडील सोन्याची चैन, दोन अंगठ्या व ॲपल वॉच काढून घेवुन, त्याला दिनांक ३०/०८/२०२४ रोजी पुणे पंढरपूर हायवेवर सोडून दिले. त्याबाबत हिंजवडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नं. ९९९/२०२४ भान्यसं कलम १४०(२),३०८(४),३०८(५),२०४,३(५) अन्वये ०५ अज्ञात इसमांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य ओळखून, मा.पोलीस आयुक्तांनी गुन्हा उघडकीस आणून आरोपीतांना तात्काळ अटक करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने खंडणी विरोधी व औद्योगिक तक्रारी निवारण पथकातील अधिकारी व अंमलदार हे घटनास्थळाजवळील तसेच टोलनाक्यावरील ७०-८० सीसीटीव्ही फुटेज पाहून तसेच तांत्रिक विश्लेषण केले असता, आरोपी हे माळशिरस जि. सोलापूर येथील असल्याबाबत खात्री झाल्याने, पथकाकडील एक टीम माळशिरस सोलापूर येथे रवाना करण्यात आली होती. पोउपनिरी सुनिल भदाणे व टीमने स्थानिक पोलीसांचे मदतीने, आरोपी नामे १) ज्ञानेश्वर विलास घाडगे वय. २६ वर्षे रा. मगर वस्ती खंडाळी गाव ता. माळशिरस जि. सोलापूर यास खंडाळी गाव ता. माळशिरस जि. सोलापूर येथून व आरोपी नामे २) योगेश विश्वास सावंत वय. ३४ वर्षे रा. दुसरा माळा जगदाळे बिल्डींग, राऊत नगर अकलूज, सोलापूर यास अकलूज, सोलापूर येथून ताब्यात घेवुन, त्याचेकडे तपास केला असता, त्यांनी दाखल गुन्हा त्यांचे इतर साथीदारांचे मदतीने केला असल्याचे निष्पन्न झाल्याने, त्यांनी गुन्हयात वापरलेली स्वीफ्ट कार व ०२ मोबाईल फोन असा एकुण ८,४०,०००/- किं.रुपयेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

आरोपी ज्ञानेश्वर घाडगे पोलीस रेकॉर्डवरील असून, त्याचेवर वेळापूर पोलीस स्टेशन, सोलापूर येथे गंभीर दुखापत केल्याचा गुन्हा दाखल असुन निष्पन्न आरोपीतांवर देखील खुनाचा प्रयत्न, गंभीर दुखापत ॲट्रोसिटी असे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त मा.श्री. विनय कुमार चौबे, सह पोलीस आयुक्त, मा. डॉ.शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त मा. श्री.वसंत परदेशी, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे मा. श्री.संदिप डोईफोडे, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-२ मा. श्री.बाळासाहेब कोपनर, यांचे मार्गदर्शनाखाली, खंडणी विरोधी व औद्योगिक तक्रारी निवारण पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण, पोउपनि सुनिल भदाणे, पोलीस अंमलदार सुनिल कानगुडे, प्रदीप गोडांबे, किशोर कांबळे, ज्ञानेश्वर कुऱ्हाडे, किरण काटकर, आशिष बोटके, प्रदीप गायकवाड तसेच तांत्रिक विश्लेषण विभागाचे पोअंम हुलगे यांचे पथकाने केली आहे.

**(संदिप डोईफोडे)**
**पोलीस उप-आयुक्त,**
**गुन्हे, पिंपरी चिंचवड**